“महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण: २०२५-२६ ते २०३५-३६” च्या अनुषंगाने राज्यस्तरीय सुकाणू समिती आणि अंमलबजावणी समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अपाऊ-२०२६/प्र.क्र.९९/ऊर्जा-७.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २६ मे, २०२६.

वाचा:- शासन निर्णय क्रमांक अपाऊ-२०२५/प्र.क्र.२२/ऊर्जा-७, दिनांक १८.०३.२०२६

**प्रस्तावना:-**

“महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५-२६ ते २०३५-३६” दिनांक १८.०३.२०२६ रोजी जाहिर करण्यात आले आहे. सदर धोरणाची यशस्वी आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, उद्दिष्टित ध्येय गाठण्यासाठी, विद्यमान धोरणे किंवा कार्यपद्धतींतर्गत उद्भवणाऱ्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी आणि वेळोवेळी आवश्यक सुधारणा करण्यासाठी, मा. मुख्यमंत्री / मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली, “राज्यस्तरीय सुकाणू समिती” (State-Level Steering Committee) व सदर धोरणाची यशस्वी व कालमर्यादेत अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने, सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली “धोरण अंमलबजावणी समिती” स्थापन करण्याची तरतुद सदर धोरणात नमूद असून, सदर समित्या गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

“महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण-२०२५-२६ ते २०३५-३६” धोरणांतर्गत मा.मुख्यमंत्री/मंत्री (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली, “राज्यस्तरीय सुकाणू समिती” (State-Level Steering Committee) व सचिव/प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली “धोरण अंमलबजावणी समिती” गठीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

१. मा. मुख्यमंत्री/मंत्री (ऊर्जा) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे “राज्यस्तरीय सुकाणू समिती” गठीत करण्यात येत आहे:-

**अ) राज्यस्तरीय सुकाणू समिती:-**

| अ.क्र. | नाव/पदनाम | अध्यक्ष/सदस्य |
|---|---|---|
| १. | मा. मुख्यमंत्री /मंत्री (ऊर्जा) | अध्यक्ष |
| २. | सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | सदस्य आणि निमंत्रक |
| ३. | सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (उद्योग) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | सदस्य |
| ४. | सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (महसुल) महसुल व वन विभाग | सदस्य |
| ५. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी | सदस्य |
| ६. | महासंचालक, महाऊर्जा | सदस्य सचिव |

**ब) समितीची कार्यकक्षा:-** समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे:-

१) या धोरणाची अंमलबजावणी योग्य रीतीने होत आहे याची खात्री करण्यासाठी, दर तिमाहीत एकदा त्याचा आढावा घेणे.

२) या धोरणाच्या अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या समस्या किंवा आंतर-विभागीय आव्हानांचे निराकरण करणे.

३) धोरणाच्या अंमलबजावणी दरम्यान प्राप्त झालेल्या अनुभवांचे आणि ज्ञानाचे मूल्यांकन करणे आणि त्यानुसार आवश्यक बदल किंवा सुधारणांची शिफारस करणे.

४) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना आवश्यक ते निर्देश देणे तसेच त्यांच्यामध्ये समन्वय सुनिश्चित करणे. आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकांना तज्ञ, संबंधित अधिकारी इत्यादींना निमंत्रित करणे.

५) धोरणाची प्रभावी आणि वेळेवर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, धोरणातील तरतुदींमधील संदिग्धता स्पष्ट करण्याचा किंवा त्याचे निराकरण करण्याचा आणि काही अडचणी उद्भवल्यास त्या दूर करण्याचा अधिकार सुकाणू समितीला असेल.

२. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे "धोरण अंमलबजावणी समिती" गठीत करण्यात येत आहे.

**अ) धोरण अंमलबजावणी समिती:-**

| अ.क्र. | नाव/पदनाम | अध्यक्ष/सदस्य |
|---|---|---|
| १. | सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी | सदस्य |
| ३. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती कंपनी | सदस्य |
| ४. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण कंपनी | सदस्य |
| ५. | महासंचालक, महाऊर्जा | सदस्य |
| ६. | मुख्य विद्युत निरिक्षक, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, चेंबूर | सदस्य |
| ७. | कार्यकारी संचालक, राज्य भार प्रेषण केंद्र, एरोली | सदस्य |
| ८. | सह सचिव, (अपारंपारीक ऊर्जा), ऊर्जा विभाग | सदस्य सचिव |

**ब) समितीची कार्यकक्षा**:-समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे:-

१) धोरणांतर्गत सुधारणा, कार्यपद्धतीतील बदल, आर्थिक प्रोत्साहन, धोरणाचा प्रसार आणि अभिप्रेत उद्दिष्टांची पूर्तता यांसारख्या उपाययोजनांची वेळेवर अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

२) वरील बाबींचे निरीक्षण करणे तसेच नियतकालिक आढावा घेणे.

३) कृती योजनांची स्थिती, प्रत्येक महिन्यात पूर्ण झालेली कामे आणि भविष्यातील लक्ष्ये व योजना यांचा आढावा घेणे, अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि प्रगतीवर देखरेख ठेवणे.

४) अंमलबजावणी दरम्यान कोणत्याही समस्या उद्भवल्यास, तिचे परीक्षण करून राज्यस्तरीय सुकाणू समितीला आवश्यक बदलांची शिफारस करणे.

५) जलद अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित भागधारकांना/संस्थांना आवश्यक सूचना देणे आणि त्यांच्यामध्ये समन्वय सुनिश्चित करणे.

३. **समितीच्या बैठका**:

समितीची तिमाहीत एकदा किंवा मा. अध्यक्ष यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बैठका आयोजित करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५२६१४५४०८६९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYANT SHARAD SAGADE

Digitally signed by JAYANT SHARAD SAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=A6FD5F8313A5DBBC809E855BE10E149644DDC66D66F20F36D4D55BCFB56CEB55, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CAF6324C416282449C4078681A5B8972EB1D149920D77CC78A41448DF59C4C9, cn=JAYANT SHARAD SAGADE
Date: 2026.05.26 14:54:59 +05'30'

**( जयंत सागडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक व औफाफ), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मंत्री व सर्व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव, (ऊर्जा) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग.
९. प्रधान सचिव, (उद्योग) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग.
१०. प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, (महसुल) महसुल व वन विभाग.
११. सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई .
१२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,मुंबई,
१३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या.,मुंबई,
१४. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.,मुंबई,
१५. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),पुणे,
१६. मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, चेंबूर
१७. सह सचिव (ऊर्जा-७), उ.ऊ.का.व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. कार्यकारी संचालक, राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली
१९. निवड नस्ती, ऊर्जा-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.